I A

③ 5

जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे
कार्यालय. दिनांक / /१९९२.

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) 7 DEC 1992
जिल्हा परिषद, ______________

विषय:- सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षात नवीन
खाजगी प्राथ. शाळांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग
क्र. व्हीएलएस १०९२/(६७/९२) प्राशि-3
दिनांक. २३-११-९२ चे पत्र.

उपरोक्त विषया संबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

या बाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्या बाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदी ला अपवाद करुन खाली नमुद केलेल्या संस्थेला तीच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी, व माध्यमातुन जुन, १९९२ पासून इयत्ता १ ली ते सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटींची पर्तता करण्याच्या शर्ती वर विनाअनुदान तत्वावर "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे, तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच विषयात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचेनाव | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|
| जिज्ञासा प्रबोधन ट्रस्ट | बिबवेवाडि पुणे | १ ली ते १९९२-९३ यावर्षी वर्गात सुरु असलेल्या वर्गासह | इंग्रजी |

१. संस्था सदर शाळा विनाअनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहीजे.

२. संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधी विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधा उपलब्ध केली पाहीजे तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दरानेच वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

३. संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाप्रमाणे मागास वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
४. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणताही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

ही परवानगी देण्यापूर्वी संस्थे बाबत खाली नमुद केलेल्या बाबींची खात्री करून मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्या बाबत कार्यवाही करण्यात यावी.

१. संबंधीत संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेचे मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारच्या गैर व्यवहार घडलेल्या असल्याबाबत या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळांना शासनाचे अनुदान घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.]
७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालु ठेवण्याबाबत प्रत्येक शिक्षणासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

True Copy
Shetye
Head Mistress
V... Niketan
English Medium School
14, Sadanand Soc. Bibvewadi
Pune-37.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत:-
१. प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ पुणे
जिल्हा ------------ यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत:- मा. सचिव ... एज्युकेशन ट्रस्ट, बिबवेवाडी, पुणे
------------------------------------------
यांना माहितीसाठी अग्रेषित.